# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक २६/०९/२०१८**

**सभा सुचना क्रं. ०७ स. ११.३० वा.**

<table>
<tr><th>अ क्र.</th><th>विषयाचे नाव</th><th>स्थायी समिती सभेचा निर्णय</th></tr>
<tr><td>१.</td><td>मागील मा. स्थायी समिती सभा दि.२०/०८/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.</td><td>ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. २०/०८/२०१८ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. नितीन राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर</td></tr>
<tr><td>२.</td><td>वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच मधील वॉर्ड नं. ९५ मध्ये चुळणे गावातील नाल्यावर आर.सी.सी बॉक्स कल्वर्ट बांधकामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.</td><td>ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन प्रभाग समिती एच मधील वॉर्ड नं. ९५ मध्ये चुळणे गावातील नैसर्गिक अस्तित्वात असलेल्या नाल्यावर तत्कालीन चुळणे ग्रामपंचायतीचे कालावधीत कल्वर्ट बांधलेला होता. सदरहू पूल सद्या नादुरुस्त व अरुंद असल्याने नव्याने आर.सी.सी बॉक्स कल्वर्ट बांधणेचे रक्कम रू. ५३९४४४२/- चे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. सदरचे कामाचे अंदात्रपत्रकाल तांत्रिक मंजूरी घेवून निविदांची कार्यवाही वर्तमानपत्रात जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करणेस त्या अनुषंगाने होणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. नितीन राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर</td></tr>
<tr><td>३.</td><td>वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्वच्छता उपद्रव नियंत्रण व तंबाखुजन्य पदार्थाचे प्रतिबंध अधिनियम २००२ अन्वये प्रशासकीय शुल्क वसुल करणेकामी प्राप्त झालेल्या निविदाधारकांसोबत संविदा करणेबाबत.</td><td>ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्वच्छता उपद्रव नियंत्रण व तंबाखुजन्य पदार्थाचे प्रतिबंध अधिनियम २००२ अन्वये प्रभाग समिती A To I मध्ये प्रशासकीय शुल्क वसुल करणेसाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील प्राप्त अभिकर्ते खालीलप्रमाणे आहे.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रभाग समिती</th><th>अभिकर्त्यांची नावे</th><th>अंतिम मान्य केलेली टक्केवारी</th></tr>
<tr><td>१</td><td>A</td><td>मे. एव्हरग्रीन सीक्युरीटी सर्व्हीसेस</td><td>७०%</td></tr>
<tr><td>२</td><td>B</td><td>मे. सिंग ईन्टेलिजेन्स सेक्युरीटी प्रा.लि.</td><td>७१%</td></tr>
<tr><td>३</td><td>C</td><td>मे. एव्हरग्रीन सीक्युरीटी सर्व्हीसेस</td><td>७०%</td></tr>
<tr><td>४</td><td>D</td><td>मे. सुरक्षा गार्ड सर्व्हीसेस</td><td>७८%</td></tr>
<tr><td>५</td><td>E</td><td>मे. सुरक्षा गार्ड सर्व्हीसेस</td><td>७८%</td></tr>
<tr><td>६</td><td>F</td><td>मे. सुरक्षा गार्ड सर्व्हीसेस</td><td>८१.५०%</td></tr>
<tr><td>७</td><td>G</td><td>मे.बक्शी सीक्युरीटी ॲण्ड पर्सनल सर्व्हीसेस प्रा.लि.</td><td>७२%</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>
<table>
<tr><td>८</td><td>H</td><td>मे. बक्शी सीक्युरीटी ॲण्ड पर्सनल सर्व्हीसेस प्रा.लि.</td><td>७०%</td></tr>
<tr><td></td><td></td><td>मे. सुरक्षा गार्ड सर्व्हीसेस</td><td>७०%</td></tr>
<tr><td>९</td><td>I</td><td>मे. सुरक्षा गार्ड सर्व्हीसेस</td><td>७०%</td></tr>
</table>
वरील प्रमाणे असणा-या प्रभाग निहाय अभिकर्त्या सोबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार संविदा करुन कार्यादेश देणेस ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे.<br>
अनुमोदक :- मा.श्रीम.महेश पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर<br>
ठराव सर्वानुमते मंजूर
</td>
</tr>
<tr>
<td>४.</td>
<td>प्रभाग समिती सी कार्यक्षेत्रातील वार्ड क्र.१८ मधील विरार (पू) टोटाळे तलावातील पाणी उपसणे, गाळ काढणे, खोदकाम करणे, वाहतुक करणे वगैरे कामास प्रशासकीय वित्तीय मंजूरी देणेबाबत.</td>
<td>ठराव :- सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. ७४,२२,४१०/- च्या खर्चास ही सभा प्रशासकीयय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर कामी ई-निविदा प्रक्रियेद्वारे निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>
अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर<br>
ठराव सर्वानुमते मंजूर</td>
</tr>
<tr>
<td>५.</td>
<td>प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं.७७ मधील शांतीपाडा येथे जय अंबे सोसायटी गेट ते जानकीपाडा मुख्य रस्त्यापर्यंत पाईप गटार बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे कामाचे अंदापत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणे बाबत.</td>
<td>ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवून उपरोक्त नमूद कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. ७४,२२,४१०/- च्या प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>
अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा.श्री.किशोर ना.पाटील<br>
ठराव सर्वानुमते मंजूर</td>
</tr>
<tr>
<td>६.</td>
<td>सन २०१८-१९ वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व सार्व. वाचनालयांसाठी लागणारी मराठी , हिंदी, इंग्रजी, गुजराती भाषेतील पुस्तके तसेच शैक्षणिक पुस्तके खरेदी करणेकामी विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबत.</td>
<td>ठराव :- सदर विषयावर आजच्या मा.स्थायी समिती सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार सन २०१८-१९ या वित्तीय वर्षाकरीता व.वि.श.म.सर्व सार्व. वाचनालयाकरीता लागणारी मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराती भाषेतील पुस्तके व शैक्षणिक पुस्तके खरेदी करणेकामी वृत्तपत्रात जाहीर निविदा सूचना प्रसिध्द करून तसेच महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहिर ई-निविदा प्रसिध्द करून निविदाधारकांकडून खरेदी करणेकामी आजची स्थायी समितीची सभा प्रशासकीय मंजूरी देत आहे. सर्व सार्व. वाचनालयासाठी लागणारे पुस्तके खरेदी करतांना सर्व प्रकारच्या पुस्तकांचे दर प्रकाशनवार मागविण्यात यावेत. जेणेकरुन महानगरपालिकेचा फायदा होईल तसेच सदर कामाचे देयक अदा करणेकरीता येणाऱ्या अंदाजित रक्कम रु. १०,००,०००/- (अक्षरी रु. दहा लक्ष मात्र) इतक्या खर्चास ही सभा वित्तीय मंजूरी देत आहे.<br>
अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. अतुल साळुंखे<br>
ठराव सर्वानुमते मंजूर</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ७. | <u>स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०१८ व City Livability मुल्यांकनाच्या कामी अनुभवी शहर समन्वयक कंत्राटीतत्वावर नेमण्यास व या कामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.</u> | ठराव :- उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवून असे ठरविण्यांत आले की, स्वच्छ सर्वेक्षण २०१९ च्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ नुसार सहा महान्यांच्या कालावधीसाठी कु. दिपाली वामन पाटलेकर व सौ. श्वेता एस.माने यांच्या केलेल्या नियुक्तीस व याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ८. | <u>आपत्कालीन परिस्थितीत शहरातील रेल्वे क्रॉसिंग कल्र्व्हट व रस्त्याखालील कल्र्व्हट मधील गाळ उपसण्यासाठी जादा क्षमतेचे सुपर सक्शन मशीन भाडे तत्वावर उपलब्ध करणेबाबत.</u> | ठराव :- उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवून असे ठरविण्यांत आले की, शहरातील रेल्वे क्रॉसिंग कल्र्व्हट मधील गाळ उपसण्यासाठी जादा क्षमतेचे सुपर सक्शन मशीन भाडे तत्वावर घेणेकामी येणाऱ्या अंदाजपत्रकीय खर्च रू. ६८,०४,०००/-खर्चास ही सभा मंजूरी देत असून याकामी पुढील ई-निविदा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ९. | <u>आपत्कालीन परिस्थितीत शहरातील सोसायटयांच्या पिण्याच्या पाण्याच्या टाक्या साफ करणेकारीता तसेच रस्त्यावरील पाणी उपसण्या करीता पंप उपलब्ध करणेबाबत.</u> | ठराव :- उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवून असे ठरविण्यांत आले की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार महापालिकेने केलेल्या निहित कार्यवाहीस तसेच प्रस्तावात नमुद केल्यानुसार बृह मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर दरानुसार व मिराभाईंडर महानगरपालिकेच्या मंजूर ठेकेदाराकडून मजीप्राच्या दर सुचिनुसार दि. १५/१०/२०१८ पर्यंत पंप भाडे तत्वावर घेणेकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मंजूरी देत असून "नैसर्गिक व आपत्ती व इतर" लेखाशिर्षावर नमुना नं, १० नुसार रू. १.५० कोटी तरतुद (पुर्न:विनीयोजन) अंती एकून तरतुद रू. १.६० कोटी) पुर्न:विनीयोजनास ही सभा मंजूरी देत आहे. तसेच महापालिकेकडे किती पंप आहेत याची खात्री करुन आवश्यक नविन पंप खपेदीचा प्रस्ताव सक्षम मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा.श्री.पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १०. | <u>वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०१८-२०१९ या वित्तिय वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये रुग्णालय निदान केंद्र थ्रीफेज मिटर/विद्युत खर्च या लेखाशिर्षामध्ये प्रा.आरोग्य केंद्र देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्षातील प्रस्तावित वाढीची रक्कम वाढवुन मिळणेबाबत.</u> | ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये रूग्णालय निदान केंद्र थ्रीफेज मीटर/विद्युत खर्च या लेखाशिर्षामध्ये प्रा.आरोग्य केंद्र देखभाल व दुरूस्ती या लेखाशिर्षातील प्रस्तावित वाढीची रक्कम वाढवून मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, महानगरपालिकेची २ रूग्णालये, ३ माता बाल संगोपन केंद्र तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व ९ दवाखाने येथे लागणारी विज ही महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी नुसार उपलब्ध होते. सन २०१८-१९ या वित्तीय वर्षामध्ये "रूग्णालय निदान केंद्र थ्रीफेज मीटर/विद्युत खर्च" या लेखाशिर्षामध्ये रू.३२,००,०००/- इतकी तरतुद करण्यांत आलेली होती. परंतु माहे जून २०१८ पर्यंत सदरच्या लेखाशिर्षामधून रू. ३४,२५,०३७/-इतका खर्च झाला असल्याने उर्वरीत महिन्यांकरीता शिल्लक तरतुद अपुरी पडत असल्याने "प्रा.आरोग्य केंद्र देखभाल व दुरूस्ती" या लेखाशिर्षाखाली रू. २,००,००,०००/- इतकी तरतुद असून माहे जून २०१८ पर्यंत खर्च निरंक असल्याने यामधून "रूग्णालय निदान केंद्र थ्रीफेज मीटर/विद्युत खर्च" या लेखाशिर्षात रू.२५,००,०००/- इतक रक्कम वर्ग केल्यास पुर्नविनीयोजनानंतर एकूण रू. ५७,००,०००/- इतकी तरतुद होईल. याकामी ही सभा मंजूरी देत असून येणाऱ्या संपुर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री.नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ११. | प्रभाग समिती ड वॉर्ड क्र.६० मध्ये फादरवाडी प्रगती कॉम्प्लेक्स येथे पाईप गटार बांधणे, जुन्या गटारावर स्लॅब व फुटपाथ बांधणे कामी उर्वरीत काम रद्द करुन सदरचे काम आहे त्या स्थितीत अंतीम करणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा करुन उर्वरीत काम रद्द करुन सदरचे काम आहे त्या स्थितीत अंतीम करणेकामी ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील सूचक :- मा.श्री.नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १२. | प्रभाग क्र.४ मध्ये विरार (पू.) बेगर्स होम नाला ते बायपास रस्ता जंक्शन पर्यंत पाईप गटार बनविणे. (दोन्ही बाजू) हे काम रद्द करणेबाबत. | ठराव :- सदरचे काम हे मा.स्थायी समिती सभा दि. २८/११/२०१७, ४३७ रोजी रद्द करणेकामी प्रस्ताव सादर केला असता जागा मालकांची पुनश्च चर्चा करावी असे ठरले होते. सदर बाबत जागा मालकांबरोबर पुनश्च चर्चा केली असता, त्यांच्या जागेत काम करुन देण्यास विरोध आहे. त्यामुळे सदरचे काम करणे शक्य नाही. त्यानुसार सदरचे काम रद्द करुन ठेकेदार मे.पाटील कन्स्ट्रक्शन ह्यांना १% इसारा रक्कम व ४% सुरक्षा अनामत व बिलातुन कपात केलेली रक्कम अदा करणेस ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १३. | प्रभाग समिती 'डी' कार्यक्षेत्रातील नवघर पुर्व ब्रिज ते एव्हर्शाईन सिटी सिग्नल पर्यंत दुभाजकामध्ये ऑक्टोगोनोल पथदिप पोल उभारुन दिवाबत्ती व्यवस्था करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- प्रभाग समिती डी मधील कार्यक्षेत्रातील नवघर पूर्व ब्रिज ते एव्हरशाईन सिटी सिग्नल पर्यंत दुभाजकामध्ये ऑक्टोगोनोल पथदिप पोल उभारुन दिवाबत्ती व्यवस्था करणे कामास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत असून ई-कार्यप्रणालीद्वारे ई-निविदा मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर ना.पाटील सूचक :- मा.श्री.अतुल साळुंखे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १४. | घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत कचरा वाहतुकीच्या वाहनांना GPS यंत्रणा बसविणेबाबत. | ठराव :- सदर बाबत सभागृहाच सविस्तर चर्चा करणेंत आली. याकामी रक्कम रु. ३२,१३,०००/- इतक्या खर्चास व ई-निविदा प्रक्रिया राबवून सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरीता एजन्सी निश्चित करण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री.अतुल साळुंखे**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १५. | श्री.हर्षल रघुनाथ पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) हयांचा ठोक मानधनात वाढ करणेबाबत. | ठराव :- महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) या मंजूर पदावर नियमित कर्मचाऱ्यांची नेमणूक होईपर्यंत करार पध्दतीने सहा-महिन्यांसाठी रु. ३०,०००/- इतक्या ठोक वेतनावर नेमणूक करण्यांत आलेल्या श्री. हर्षल पाटील यांचे ठोक वेतनात रु. २०,०००/- इतकी वाढ करुन ते रु. ५०,०००/- इतके करण्यास तसेच सदरचा खर्च "सामान्य प्रशासन (ई-गव्हर्नन्स)" ह्या लेखाशिर्षखाली भागविण्यास ही स्थायी सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री.किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| १६. | वसई विरार शहर महानगरपालिकेतील जन्म व मुत्यू नोंदणीचे दस्ताऐवज डेटा एन्ट्री करणेकामी ई-निविदा प्रक्रियेद्वारे मंजूर निविदाधारकाबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.(निविदा क्रं.७२३०) | ठराव :- सदरबाबत सभागृहात साधक/बाधक चर्चा करणेंत आली. याकामी सर्वात कमी दराच्या ई-निविदा काराबरोबर संविदा करण्यांस मा.स्थायी समिती सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील सूचक :- मा.श्री. अतुल साळुंखे<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १७. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत बालवाडी व अंगणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षात वजन काटे वाटप करणे कामी सर्वात कमी दराच्या निविदाकाराच्या दरास मंजूरी देवून कमी व योग्य दराच्या निविदाधारकांसोबत संविदा करणेस मान्यता देणे. | ठराव :- सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा होवून सन २०१८-१९ ह्या वित्तीय वर्षात अंगणवाडी व बालवाडीसाठी तुर्तास वजनकाटे बाबतचा विषय नामंजूर करण्यांत येवून त्याबाबत फेर निविदेची कार्यवाही करण्यांत यावी. याबाबत ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.महेश पाटील सूचक :- मा.श्री.पंकज पाटील<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| १८. | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षात शालेय साहित्य वाटप करणे कामी सर्वात कमी दराच्या निविदाकाराच्या दरास मंजूरी देवून कमी व योग्य दराच्या निविदाधारकांसोबत संविदा करणेस मान्यता देणे. | ठराव :- सदर जि.प शाळेच्या प्रस्तावात सविस्तर चर्चा करण्यात आली. जे.एम.डी एंटरप्रायजेस :- घटक क्र.१ (अ,ब,क) दप्त मॅटी मटेरियल प्रति नग दर अनक्रमे १०७,१०८,११४.८०हरजित कलेक्शन :- घटक्र क्र. २ (अ,ब,क) रेनकोट प्रति नग दर अनुक्रमे ११४,११८,११८ घटक क्र ३ (ब,ऊ)बुट पॅरागान कंपनी प्रति नग दर अनुक्रमे १७९,२४९ घटक क्र.४(अ,ब,क,ड,इ) मोजे सुपरलोन सफेद प्रति नग दर अनुक्रमे १३.२५,१३.५०,१३.७५,१४,१४.२५घटक क्र.१२ ( अ,ब ) ८४ पृष्ठ १८० पृष्ठ वहया प्रति नग दर अनुक्रमे १२.८०,२०.९०मे.दहिवाले एंटरप्रायजेस :- घटक क्र.५ ड्रॉईंग कलरपेटी फेअर कॉस्टल प्रति नग दर अनुक्रमे ३१ रु.घटक क्र.६वॉटर कलर कॅमलिन प्रति नग दर अनुक्रमे ५०.७५ घटक क्र.७ कॅमलिन जॉमेट्रि कंपास बॉक्स प्रति नगर दर अनुक्रमे ५०.९५ घटक क्र.८ ड्राईंग बुक स्कॉलर ३/ए जम्बो प्रति नग दर अनुक्रमे २१.९५ घटक क्र.९ पेन्सील फेबर कॉस्टल प्रति नग दर ३४.१५ घटक क्र.१० प्लास्टिक १२.इंच प्रति नग दर ६.६०घटक क्र.११ (ब) टुथब्रश कोलगेट कंपनी प्रति नग दर १२.५०मे.मुरबाडकर एंटरप्रायजेस घटक क्र.११(अ)अप्रति नग दर १२ रु. मे. ऐम के.शहा एंटरप्रायजेस घटक क्र. (३) अ,क,ड,इ,ई प्रति नग दर अनुक्रमे १७३,२०४,२०८,२४०,२४५ सदर दरांची बाजारभावाप्रमाणे पडताळणी केली असता दर बाजार भावाप्रमाणे योग्य व वाजवी असल्याने मंजूर करण्यात येत आहेत. तसेच जि.प शाळेतील विदयार्थ्यांना रेनकोट ,बुट,व मौजे हया बाबीचे दर सुध्दा मंजूर करण्यात येत असून त्यांचे वाटप करणे बाबतचा निर्णय प्रशासकीय स्तरावर टरवून पुढील कार्यवाही करण्यात यावी. त्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ (क) अन्वये सर्वात कमी दरांचा ई- निविदाधारकां बरोबर संविदा करण्यास व जि. प शाळेतील मुलांना आवश्यकते नुसार साहित्य खरेदी करण्यात तसेच येणा-या रु.१,४७,६४,७६४/- खर्चास तसेच नामंजूर निविदाधारकांची सुरक्षा अनामत परत करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| १९. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत बालवाडी व अंगणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षात शालेय साहित्य वाटप करणे कामी सर्वात कमी दराच्या निविदाकाराच्या दरास मंजूरी देवून कमी व योग्य दराच्या निविदाधारकांसोबत संविदा करणे मान्यता देणे. | ठराव :- सदर अंगणवाडी प्रस्तावा बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली या बाबत में. हरजित कलेक्शन घटक क्र.१ (अ,ब,क) दप्तर , वॉटर बॅग व टिफिन बॉक्स प्रति नग दर अनुक्रमे रु.८८,१८,१४ या कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ क अन्वये कमी दरांच्या निविदाधारकांबरोबर संविदा करुन अंगणवाडीतील मुलांना आवश्यकतेनुसार साहित्य खरेदी करण्यास तसेच येणा-या २१,००,०००/- रु. खर्चास तसेच नामंजूर निविदाधारकांची सुरक्षा अनामत परत करणेस ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २० | वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पू) येथील वॉर्ड क्र.२७ मध्ये नॅशनल शाळा ते मनवेलपाडा तलावापर्यंतच्या रस्त्यास दुभाजक बसविण या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वरील प्रस्तावाबाबत मा.स्थायी समिती सभेत चर्चा करण्यांत आली. मे. स्वराज कन्स्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) ४.००% कमी दराची निविदा लघुत्तम दराची निविदा आहे. तथापि सदर ठेकेदाराने महाराष्ट्र शासन साबांवि शासन निर्णय क्र. बीडीजी २१६/प्र.क्र. २/इसा.२, मंत्रालय दि. १२/०२/२०१६ च्या निर्णयाप्रमाणे परफॉर्मन्स सिक्युरीटी धनाकर्ष सादर केला नसल्याने मे. स्वराज्या कन्स्ट्रक्शन यांची निविदा अपात्र ठरत असून परफॉर्मन्स सिक्युरेटी धनाकर्ष सादर केलेल्या द्वितीय लघुत्तम निविदाधारक (Second Lowest) मे.हिरालाल सोनार यांनी ३.१०% कमी दराची निविदा तुलनात्मकरीत्या इतर निविदांच्या तुलनेत कमी आहे. परंतु मे.हिरालाल सोनार यांनी क्र. ३.१०% कमी दराने भरणा केलेले दर महानगरपालिकेस जास्त वाटत असल्याने दि. २३/०२/२०१८ रोजीच्या निविदा सिमिती सभेपुढे मे. हिरालाल सोनार यांचे सोबत वाटाघाटी करणेबाबतच मान्यता देण्यांत आली आहे. त्या अनुषंगाने सदर ठेकेदारास मे. हिरालाल सोनार यांना वाटाघाटी करणेबाबतचर्चा करणेसाठी दि. २७/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. तद्अनुंषंगाने सदर काम ४.००% कमी दराने करणेंस तयार असलेबाबत मे.हिरालाल सोनार यांनी दि. २७/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयास कळविले आहे. तरी महाराष्ट्र महापालिका अधिनिम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस केली आहे. या ठरावान्वये मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार संविदा करणेंस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर ना.पाटील सूचक :- मा.श्री. उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २१. | प्रभाग क्रमाक १ मधील भातपाडा नाका ते बरफपाडा गाव, कांदळपाडा नाका ते कांदळपाडा गांव (महाकाली मंदीर), कुंभारपाडा नाका ते | ठराव :- प्रभाग क्रमांक १ मधील भातपाडा नाका ते बरफपाडा गाव, कांदळपाडा नाका ते कांदळपाडा गांव महापाली मंदिर, कुभांरपाडा नाका ते परेडपाडा पर्यंत तसेच विविध परिसरात दिवाबत्ती व्यवस्था करणे कामाचे प्राप्त मे.यश इंजिनिअरींग, मुंबई यांची ४.७०% जास्त दराची निविदेसोबत संविदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर ना.पाटील सूचक :- मा.श्री. उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| | परेडपाडा पर्यंत तसेच विविध परिसरात दिवाबत्ती व्यवस्था करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराचे निविदा धारकासोबत संविदा करणेंस मान्यता मिळणेबाबत. | |
| २२. | सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षातील वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना उसगाव/शिरवली उद्‌भव २० द.ल.ली क्षमता योजना चालविणे व जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामी संविदा करणेस मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क)नुसार मे.ॲशलॉन एंटरप्रायजेस यांच्या कमी दराच्या निविदेस संविदा करण्यास मान्यता देण्यांत येत असून सदर कामाची मुदत ही तीन वर्षापर्यंत राहील अशी ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर ना.पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २३. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी गोखिवरे कार्यक्षेत्रातील दैनंदिन बाजार शुल्क ठेका पध्दतीने करणेसाठी निविदा प्रकियेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवून, प्राप्त निविदांपैकी अ.क्र. ०१ अंजली ट्रडींग यांची निविदा जादा दराची आहे. सन २०१८/१९ या वर्षासाठी अंजली ट्रेडर्स यांच्या रक्कम रू. २४,००,००३/- (अक्षरी रू. चोवीस लाख तीन रूपये मात्र) या सर्वात जास्त रक्कम असलेल्या निविदेस आजची सभा मान्यता देत आहे. सन २०१८/१९ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिकेच्या अटी-व शर्तीस अधिन राहून गोखिवरे विभाग कार्यक्षेत्रातील दैनंदिन बाजार कर वसुली वार्षिक ठेका देण्यास आजची सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २४. | वसई विरार शहर महानगरपालिकेसाठी सन २०१८-१९, २०१९-२० या वित्तीय वर्षासाठी स्टेशनरी छपाई खरेदी करुन पुरवठा करणेबाबतच्या दरास मंजुरीबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावार सविस्तर चर्चा करण्यात आली वाटाघाटी अंती प्राप्त दर मंजूरीस निविदा समितीने दि. २०/०७/२०१८ रोजीचे समेत मंजुरीस शिफारस दिलेली आहे.<br>**१)चंडीका प्रिंटर्स :-** घटक क्र. १/ अ/ १ ते ४, ७, ८, १३, १/ ड/ १, २, ३/ १ ते २, ४, ते ९, ४ अ/ २, ४, ५, ७. ४/ ब/ १, ३, ४, ६, ४/ क/ १ ते ६, ४/ ड/ १ ते ६, ४ / इ/ १ ते ६, ४/ ई/ १ ते ६, ५/ अ/ १, ३ ते ६, ५/ ब/ ३, ४, ५, ६, ५/ क/ १, ३. ४, ५, ६, ५/ ड/ १, ३, ४, ५, ६, ५/ इ/ १ ते ४, ६, ५/ई / १ ते ६, ६ / अ /८, ९ ६/ ब ८, ९, ६/ ड / ९, ११, १४, ८/ अ/ ६, ७, ११, ८/ ब/ ४, ६, १२/ १ ते ४, १३/अ/१ ते ३, १५/ब/२,६, १६/अ/१,४,१६/ब/१ ते ४, १८/अ/१,२,१८/ब/१,२, २४/अ/१ ते ७, २४/ब/१ ते ६.<br>**२)एच.एम.पी. इंटरप्रायजेस :-** घटक क्र. १/ब/१ ते ३, १/क/१ ते ३, १/इ/१,२/१ ते १०, ५/क/२, ५/ड/२,५/इ/५,६/अ/१ ते ७, १०, १२, १३, ६/ब/१ ते ७, १४, ६/क/१ ते १०, १२ ते १४, ६/ड/१ ते ८, १०, ७/अ/१ ते ३, ७/ब/१ ते ३, ८/अ/४,१२, ८/ब/२,९,१०,१०/५, ११/१ ते ४, १३ब/१,१३/ब/५, १३/क/२,५,१५/ब/४,५,१५/क/३ ते ५, १५/ड/३,५,६,२०/अ/२, २०/ब/१,२१/अ/२,२१/ब/१, २३/१, ३२, २७. |

| | | |
|---|---|---|
| | | १)श्री अनिरुध्दाय इंम्प्रेशन :- घटक क्र. १/अ/५ ते ६,१०,११,३/३,६,१०,,४/अ/१,३,६,४/ब/२,५,५/अ/२,५/ब/२,६/अ/११,६/ब/१०,६/क/११,६/ड/१२,८/अ/१,५,९,१०,८/ब/३, ८/ब/७, १०/६, १३/अ/५,१३/ब/२,३,६,१३/क/ १,७ ते ९,१४/अ/१ ते ४, १४/ब/१ ते ४, १५/ब/१,१५/क/१,२,१५/क/६, १५/ड/१,२,४, १६/अ/३,५,१७/अ/१ ते ५, १७/ब/१ ते ५, १७/क/१ ते ५, १७/ड/१ ते ५, १८/अ/१, १८/ब/१, १९, २४/क/१,२, २६/१/१ ते १४, २६/२/१ ते ७, २६/३/१ ते ६, २६/४, २६/५, २६/६, २६/७, २६/८/१ ते ७.<br>१)मुकुंद प्रिन्टर्स :- घटक क्र. १/अ/९,१२,५/ब/१,६/अ/१४,६/ड/१३,८/ब/१,११,१३/अ/४, १३/ब/४, १५/अ/३ ते ६, १५/ब/ ३ , १६/ब/५, २०/अ/१,३,४, २०/ब/२ ते ४, २१/अ/१,३,४, २१/ब/२,३,४, २२/अ/१ ते ४, २२/ब/१ ते ४, २३/२ ते २३, २७, २८, ३१, २५/१.<br>२)महाराणी प्रिन्टर्स :- घटक क्र. ६/ब/११ ते १३, ८/अ/२,३, ८/अ/८, ८/ब/५,८, १०/१ ते ४,७,८, १३/क/३ ते ४,६,१५/अ/१ ते ३, १६/अ/२, २३/१४/३, २३/२४ ते २६, २९, ३०, २५/२,३.<br>वाटाघाटी अंती प्राप्त दर हे योग्य व वाजवी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ (क) अन्वये वाटाघाटीद्वारे प्राप्त झालेले दर सन २०१८/१९ व २०१९/२० या वित्तीय वर्षाकरीता मंजुरीस व संविदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २५. | वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती -अे अंतर्गत येणाऱ्या बोळींज विभाग येथील दैनंदिन बाजारकर लिलावाची जादा दराची ई निविदा मंजुर करणेबाबत | ठराव :- वसई-विरार शहर महनगरपालिका प्रभाग समिती अे, अंतर्गत येणाऱ्या बोळींज विभाग येथील दैनंदिन बाजार वसुलीकामी प्राप्त झालेल्या वरील निविदेपैकी अ.क्र.३ एस.पी. इंटरप्रायजेस यांची निविदा रक्कम रू. १०,८१,७८६/- (सर्वात जास्त आहे. तसेच १२% (GST) रू. १,२९,८१४/- असे एकूण रक्कम रू. १२,११,६००/- (अक्षरी बारा लाख अकरा हजार सहाशे रुपये मात्र) एवढ्या जास्त रक्कमेची ई-निविदा व संविदा करणेंत ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २६. | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण मोहीम राबविणेसाठी डस्टबीन खरेदी करणेकामी आलेल्या ई निविदेस मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण मोहिम राबविणेसाठी २४० लिटर क्षमतेच्या HDPE डस्टबीन्स आलेल्या ई-निविदेत प्रायमा प्लास्टिक लि. यांचा दर प्रति डस्टबीन्स खरेदी रक्कम रू. १,९६०/- (अक्षरी रू.एक हजार नऊशे साठ मात्र) एवढा होत असून ५,४२७ इतक्या डस्टबीन्स खरेदी करणेंस रक्कम रू. १,०६,३६,९२०/- (अक्षरी रक्कम रू. एक कोटी सहा लक्ष छत्तीस हजार नऊशे वीस मात्र) एवढा खर्च होणार आहे. परंतु मा.सर्वसाधारण ठराव क्र. १४ दि. १४/०८/२०१७ अन्वये रक्कम रू. १,९५,३७,२००/- (अक्षरी रक्कम रू. एक कोटी पंच्याण्णव लक्ष सदतीस हजार दोनशे मात्र) एवढ्या रक्कमेस मा.सर्वसाधारण सभेने प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान केली आहे. परंतु डस्टबीन खरेदीसाठी मागविण्यांत आलेल्या ई-निविदेस प्रायमा प्लास्टिक प्रा.लि. यांनी भरलेला दर अंदजित दरापेक्षा कमी असल्याने अंदाजित रक्कमेत ९,९०० डस्टबीन्स खरेदी करणेस रक्कम रू. १,९५,३५,३२०/- (अक्षरी रक्कम रू. एक कोटी पंच्याण्णव लक्ष पस्तीस हजार तीनशे वीस मात्र) एवढ्या रक्कमेस २४० लि. क्षमतेच्या HDPE डस्टीबीन्स प्रायमा प्लास्टिक प्रा.लि. यांच्याकडून खरेदी करणेकर्ड्मी संविदा करणेस ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.अतुल साळुंखे सूचक :- मा.श्री.महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २७. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागासाठी कंन्स्ट्रक्शन ट्रॅकर (बजेट कन्ट्रोल सहित) सॉफ्टवेअर (संगणक प्रणाली) तयार करणे | ठराव :- सदरबाबक सभागृहात साधक-बाधक चर्चा करणेंत आली. याकामी सर्वात कमी दराच्या ई-निविदा काराबरोबर संविदा करण्यास मा.स्थायी समिती मान्यता देत आहे<br>**अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. महेश पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| | कामी ई-निविदा प्रकियेद्वारे मंजुर निविदाधारकाबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. (निविदा क्र.७६९२) | |
| २८. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार वॉर्ड क्र.४२ गणेश नगर येथे रस्ता खडीकरण करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराच्या निविदाधारकासोबत संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे.एस.एम.डेव्हलपर्स यांची निविदा १०.००% कमी दराची ही प्राप्त निविदांमध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २९. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मुख्यालय व प्रभाग समिती ए ते आय अंतर्गत मालमत्ता कर व पाणीपट्टी विभागाचे कामकाजासाठी कुशल मनुष्यबळ बाहययंत्रणेद्वारे (आऊटसोर्सिगद्वारे) कंत्राटी सेवा उपलब्ध करुन देणेकामी लघुत्तम निविदाधारकासोबत संविदा करणेबाबत. | ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ क नुसार मे. विशाल एक्सपर्ट सर्विसेस प्रा.लि.पुणे यांचा २.२५% हा लघुत्तम दर मंजूर करुन त्यांचेसोबत संविदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३०. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या डिझेल जनित्र यांची सन २०१८-१९,२०१९-२० व २०२०-२१ या तीन वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणे व आवश्यक स्पेअर पार्ट (साहित्यासह) फिटींग करणे तसेच भाडेतत्वावर जनरेटर घेणे कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- तरी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या डिझेल जनित्र यांची सन २०१८-१९,२०१९-२० व २०२०-२१ या तीन वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणे व आवश्यक स्पेअर पार्ट (साहित्यासह) फिटींग करणेकामी वार्षिक दराची ई-निविदा मागविणे त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु.७० लक्ष पर्यंतचे खर्चास तसेच निविदेची कार्यवाही होईपर्यंत मंजूर निविदा धारकांस मुदतवाढ देणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ३१. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती जी वालिव कार्यक्षेत्रातील दैनंदिन व आठवडा बाजार शुल्क ठेका पध्दतीने करणेसाठी निविदा प्रक्रियेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन, प्राप्त निविदांपैकी अ.क्र. ०१ ज्ञानराज रमेश माळवी यांची निविदा जादा दराची आहे. सन २०१८-१९ या वर्षासाठी ज्ञानराज रमेश माळवी यांच्या रक्कम रु ३१,४८,६३९/- या सर्वात जास्त रक्कम असलेल्या निविदेस आजची सभा मान्यता देत आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहून गोखिवरे विभाग कार्यक्षेत्रातील दैनंदिन बाजार कर वसुली वार्षिक ठेका देण्यास पुढील आदेश होईपर्यंत आजची सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत   सूचक :- मा.श्री. किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३२. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार पूर्व व पश्चिमेला जोडणाऱ्या रेल्वे उड्डाणपूलावर (L.V.४० R.O.B.) लिफ्ट व जिना बनविणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर कामास सर्वसाधारण सभा ठराव क्र. ६ दि. १३/१०/२०१७ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मकदृष्ट्या मे. स्पेक्ट्राम कन्स्ट्रक्शन ह्यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा लघुत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिकाचे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. तरी मा.आयुक्तांच्या शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिकाचे कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील   सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३३. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५ नुसार प्रभाग समिती डी- नालासोपारा पूर्व विभाग, प्रभाग समिती ई- नालासोपारा पश्चिम विभाग व त्या अंतर्गत येणाऱ्या उपविभागीय कार्यालयांचे लेखापरिक्षण अहवाल मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करणेबाबत. | ठराव :- लेखापरिक्षण विभागाने वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती डी-नालासोपारा पूर्व विभाग, प्रभाग समिती ई-नालासोपारा पश्चिम विभाग व त्या अंतर्गत येणाऱ्या उपविभागीय कार्यालयांचे दि. १ एप्रिल २०१६ ते दि. ३१ मार्च २०१७ या आर्थिक वर्षातील लेखापरिक्षण अहवालास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत   सूचक :- मा.श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३४. | प्रभाग समिती एच मधील वार्ड नं. ९६ मध्ये तुळजाभवानी गार्डन ते चुळणा तलाव पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या रक्कम रु.६९,४९,५५८/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री.उमेश नाईकक<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

| | | |
|---|---|---|
| ३५. | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एच मधील वॉर्ड नं. १०१ मध्ये माणिकपूर नाका ते रॉबर्ट वाझ याचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामाचे अंदापत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- वरील प्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होवून उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या रक्कम रु. २२,०५,२९४/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. विद्या पाटील सूचक :- मा.श्री.कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३६. | प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड नं. ११५ मध्ये खोलांडे पाडा येथे समाजमंदिर बांधणे. (मा.आमदार श्री हितेंद्रजी ठाकूर यांच्या आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत सन २०१६-१७) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. तुषार शशिकांत मांडवकर ह्यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेंस तसेच येणाऱ्या अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.नितीन राऊत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३७. | प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं. ९१ मध्ये मढवीपाडा ते भोयदापाडा राजावली मुख्य रत्यापर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३८. | प्रभाग समिती बी हद्दीतील नालासोपारा (पुर्व) येथील तुळींज विरार चौक ते तुळींज पोलिस चौकी पर्यंत रस्ता रुंदीकरणात येणारे एच.टी.पोल, वाहिन्या | ठराव :- प्रभाग समिती बी हद्दीतील नालासोपारा (पूर्व) येथील तुळींज विरार चौक ते तुळींज पोलिस चौकी पर्यंत रस्ता रुंदीकरणात येणारे एच.टी.पोल, वाहिन्या हटविणे व भुमिगत केबलद्वारे एच.टी. वाहिन्या पुर्नस्थापित करणे कामी प्राप्त मे.स्नेहा एंटरप्रायजेस, ठाणे यांची निविदा ही म.रा.वि.वि. कंपनीचे अंदाजपत्रकीय रक्कमेवर ३३% जास्त दराची असून सदर विषयांकित कामी मे. स्नेहा एंटरप्रायजेस, ठाणे यांचे सोबत संविदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.विद्या पाटील सूचक :- मा.श्री. उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| | हटविणे व भुमिगत केबल्सद्वारे एच.टी. वाहिन्या पुर्नस्थापित करणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराचे निविदा धारकासोबत संविदा करणेंस मान्यता मिळणेबाबत. | |
| ३९. | प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील वॉर्ड क्र.५ मध्ये मांडवी येथे चिंतामण गायकवाड यांच्या घरापासुन ते मांडवी मेन रोड पर्यंत पाईप गटार बनविणे कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराच्या निविदाधारकासोबत संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. तुषार शशिकांत मांडवकर यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने ही प्राप्त निविदांमध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४०. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सर्व सार्वजनिक ग्रंथालयांमार्फत आकारण्यात येणाऱ्या फी मध्ये समानता आणणेकामी विचार विनिमय करुन निर्णय घेणे. | **ठराव :-** सदर विषयावर आजच्या मा.स्थायी समिती सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार खालील तक्त्यात नमुद केलेल्या तपशिलानुसार ही सभा मंजूरी देत आहे. |

| अ.क्र. | ग्रंथालयाचे नांव | प्रौढ वाचक | | | | बाल वाचक | | | | आजीवन वाचक | | दिवाळी अंक ग्रंथालय वाचक फी | दिवाळी अंक बाहेरील वाचक फी | अभ्यासिका वाचक फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनामत | प्रवेश फी | वार्षिक फी | दंड | अनामत | प्रवेश फी | वार्षिक फी | दंड | अनामत | प्रवेश फी | | | |
| १ | सार्व. वाचनालय, विरार | ४००/- | १०/- | २४०/- | १/- | १००/- | १०/- | १२०/- | १/- | २०००/- | १०/- | १००/- | १५०/- | मासिक फी ६०/- |
| २ | सार्व. वाचनालय, ना.सो. | ४००/- | १०/- | २४०/- | १/- | १००/- | १०/- | १२०/- | १/- | २०००/- | १०/- | १००/- | १५०/- | मासिक फी १२०/- |

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | डॉ. के. ब. हेडगेवार सार्व. वाचनालय, नवघर | ४००/- | १०/- | २४०/- | १/- | १००/- | १०/- | १२०/- | १/- | २०००/- | १०/- | १००/- | १५०/- | मासिक फी १००/- |
| ४ | डॉ. धोंडो केशव कर्वे स्मृती ग्रंथालय, वसई | ४००/- | १०/- | २४०/- | १/- | १००/- | १०/- | १२०/- | १/- | २०००/- | १०/- | १००/- | १५०/- | - |

अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. उमेश नाईक

ठराव सर्वानुमते मंजूर

| | | |
|---|---|---|
| ४१. | वसई विरार शहर महानगरपालिकेसाठी सन २०१८-१९, २०१९-२० या वित्तिय वर्षासाठी दुरध्वनी यंत्रणा देखभाल दुरुस्ती करणेच्या दरास मंजुरीबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यांत आली. वाटाघाटी अंती प्राप्त दर मंजूरीस निविदा समितीने दि. २०/०७/२०१८ रोजीचे सभेत मंजूरीस शिफारस दिलेली आहे. प्राप्त दर हे योग्य व वाजवी असून महाराष्ट्र महापालिका अधिनियम ७३ (क) अन्वये वाटाघाटीद्वारे प्राप्त दर सन २०१८/१९ व २०१९/२० या वित्तीय वर्षाकरीता मंजूर निविदाधारक मे. पंत समर्थ एंटरप्रायजेस, मे.सिकॉन सर्व्हिसेस यांचेबरोबर संविदा करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.वैभव पाटील सूचक :- मा.श्री. महेश पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ४२ | अग्निशमन कर्मचारी यांचे दि. ०१/०३/२०१८ ते दि. २०/०४/२०१८ या कालावधीचे वेतन आदा करणेस प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- प्रशासनाकडून पाहणेंत आला. त्यानुसार महानगरपालिकेच्या कंत्राटी पध्दतीवर १० चालक यंत्रचालक व ४० फायरमन (ठेका) यांना दि. १ मार्च २०१८ पासून ते दि. २०/०४/२०१८ पर्यंतच्या कालावधीचे वेतन अदा करणे व त्यासंबंधी मंजूर ठेकेदारास उपरोक्त कालावधी करीतांचे कार्यादेश देणेकामी व सदरचे वेतनापोटी येणाऱ्या खर्चास आजची मा.स्थायी समिती सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.पंकज पाटील सूचक :- मा.श्री. उमेश नाईक<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

नगरसचिव

वसई-विरार शहर महानगरपालिका